राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र.रामाआ/नाशिक/तक्रार (प्रअ) क्रमांक :- ५५६/२०२०/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण

१ श्री. एस.एस.शर्मा, : तक्रारकर्ता
चत्रभुज चाळ, शिरपूर,
ता.शिरपूर, जि.धुळे.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),
नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालय,
भुजबळ नॉलेज सिटी जवळ,
आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालय,
भुजबळ नॉलेज सिटी जवळ,
आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक.

विवेचन

उपरोक्त तक्रारीसंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १०/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये कार्यालयाला एस.एस.शर्मा, रा.शिरपूर, जि.धुळे या नावे दिनांक ०८/०२/२०२० रोजीचे पोष्टाद्वारे पाठविलेले तक्रार अर्जावरती कार्यालयाने केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. त्यानुषंगाने आयोगाने दिनांक २३/०७/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामीण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी तक्रारकर्त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दाखल झालेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तक्रारकर्त्यांना अद्यापही माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसात त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

सदर आदेशास अनुसरुन श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामीण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी आयोगाकडे दिनांक ०५/०८/२०२१ रोजी टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, सदर कालावधीत जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), श्री.शहाजी नरसुडे (सेवानिवृत्त) हे कार्यरत होते. तक्रारदारास त्याच्या माहिती अर्जास अनुसरुन दिनांक ०६/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले की, मागणी केलेल्या माहितीचे अनुषंगाने संबंधित शाखेशी पत्रव्यवहार केला असता, संबंधित शाखेने दिनांक ०६/०३/२०२० अन्वये तक्रार निवारण कक्षातील अर्ज् नोंद रजिस्टर तपासले असता तक्रारदार यांनी मागितलेली माहिती तक्रार निवारण कक्षाच्या अभिलेखावर आढळुन येत नाही. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर माहितीबाबत कसून शोध घेवून तक्रारदारास पुरवावी, असे आदेशित केले होते त्यानुसार शोध घेतला असता तक्रारदार यांचा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नसल्याबाबत तक्रारदारास दिनांक ०८/१०/२०२० अन्वये कळविले आहे. त्याबाबतच्या स्थळप्रती आयोगास सादर करीत आहे. तरी प्रस्तुत माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती पुरविली असल्याने त्यांचा खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांच्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीसंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामीण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी नमूद केले आहे की, सदर कालावधीत जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), श्री.शहाजी नरसुडे (सेवानिवृत्त) हे कार्यरत होते. तक्रारदारास त्याच्या माहिती अर्जास अनुसरुन दिनांक ०६/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले की, मागणी केलेल्या माहितीचे अनुषंगाने संबंधित शाखेशी पत्रव्यवहार केला असता, संबंधित शाखेने दिनांक ०६/०३/२०२० अन्वये तक्रार निवारण कक्षातील अर्ज् नोंद रजिस्टर तपासले असता तक्रारदार यांनी मागितलेली माहिती तक्रार निवारण कक्षाच्या अभिलेखावर आढळुन येत नाही. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर माहितीबाबत कसून शोध घेवून तक्रारदारास पुरवावी, असे आदेशित केले होते त्यानुसार शोध घेतला असता तक्रारदार यांचा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नसल्याबाबत तक्रारदारास दिनांक ०८/१०/२०२० अन्वये कळविले आहे. त्याबाबतच्या स्थळप्रती आयोगास सादर केली आहेत. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१) श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामीण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 03 NOV 2021

प्रती,

श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामीण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगांव, नाशिक, ता.जि.नाशिक.